MHRG110005202019

RCS No. 82/2019

<u>नियमित दिवाणी दावा क्र.८२/२०१९ मधील निशाणी ३३ खालील आदेश</u>

**(हरीश्चंद्र कांबळे वगैरे वि. राजेश्री ढेपे वगैरे)**

वादीने प्रस्तुतचा अर्ज वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द मनाई हुकुमाकरिता व निरंतरच्या ताकिदीकरिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यातील वादी क्र. १ श्री. हरिश्चंद्र मारुती कांबळे हे दिनांक १४.१०.२०२४ रोजी मौजे मेढे, ता. तळा, जि. रायगड येथे मयत झाले आहेत. वादी क्र. १ यांच्या मृत्यूमुळे दाव्यास असलेले कारण नष्ट झालेले नाही. त्यामुळे सदरकामी वादी क्र. १ यांचे वारस दाव्याकामी दाखल करणे आवश्यक आहे. वादी क्र. १ मयत झाल्याने त्यांच्या वारसांना मानसिक धक्का बसला व अज्ञानीपणामुळे मुदतीत वारस अभिलेखावर घेतले नाहीत. वारस अभिलेखावर घेण्यास १५ दिवसांचा झालेला विलंब हा वादीच्या निष्काळजीपणामुळे झालेला नाही. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे पैशात कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. सबब वादीने प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेची विनंती केली आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तूत अर्जावरच म्हणणे दाखल करुन असे कथन केले आहे की, अर्जातील मजकूर प्रतिवादीला मान्य कबूल नाही. वादी यांनी विलंबाबाबत दिलेले कारण संयुक्तीक नाही. सबब अर्ज नामंजूर करणेत यावा.

४. निशानी ३३ वरील अर्ज, त्यावरील म्हणणे व त्या पुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुत अर्जान्वये वादी क्र.१ हरिश्चंद्र मारुती

कांबळे यांचे वारस अभिलेखावर घेणेबाबत झालेला विलंब माफ होवून मिळणेबाबत विनंती केलेली आहे. वादीचे असे कथन आहे की, मयत वादी क्र.१ यांचा मृत्यूमुळे वारसांना मानसिक धक्का बसल्यामुळे त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डला घेता आले नाहीत. प्रस्तुत दावा हा मनाई हुकुमाकरिता व निरंतरच्या ताकिदीकरिता मिळणेबाबत दाखल केला आहे. तसेच दाव्याचा गुणदोषांवर निपटारा होणेकरिता तसेच फलित व परिणामकारक हुकूमनामा होणेकरिता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित ठरते. वादीचे कथनाप्रमाणे वादी क्र.१ हरिश्चंद्र मारुती कांबळे हे दि. १४.१०.२०२४ रोजी मयत झाले आहेत व वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दि. २८.०१.२०२५ रोजी दाखल केलेला आहे. वादीने विलंबाने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला केवळ या कारणास्तव अर्ज नामंजूर करणे न्यायोचित होणार नाही. दाव्याचे स्वरुप विचारात घेता तसेच वादींनी केलेला विलंब पाहता प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादींना खर्च देणेचे अटीवर मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

निशाणी ३३ वरील अर्ज वादीने प्रतिवादी यांना र.रु.१००/- खर्च देणेचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

SONTAKKE AHILYABAI BALIRAM

Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2025.06.09 17:38:35 +0530

माणगाव. [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः-०९.०६.२०२५. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.